# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**<u>प्रस्तावना</u> :-**
**{ झो.प. वाटप कक्ष }**

नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील, नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय विभागाच्या मालकीच्या (वन विभाग वगळून) ना.सु.प्र. च्या मालकीच्या जागेवरील अतिक्रमित झोपडपट्टयातील अतिक्रमणे नियमानुकूल करुन भाडेपट्टा देण्याकरीता अशा जागेवरील जागा / झोपडी / घर करीता थकीत असलेल्या मालमत्ता करावर आकारलेली शास्ती माफ करण्याकरीता <u>अभय योजना-2025 राबविणे.</u>

"सर्वांसाठी घरे-2022" या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होणे हेतू नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील, नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय विभागाच्या मालकीच्या (वन विभाग वगळून) ना.सु.प्र. च्या मालकीच्या जागेवरील अतिक्रमित झोपडपट्टयातील अतिक्रमणे नियमानुकूल करुन भाडेपट्टा देण्याबाबत महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्र.एमसीओ-2018/प्र.क्र.197/नवि-18, दिनांक 17/11/2018, महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 14/01/2019 ची अधिसूचना, शासन निर्णय क्र.एमसीओ-2018/प्र.क्र.309/नवि-14, दिनांक 07/02/2019, शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र.एमयुएन-2015/प्र.क्र.53/नवि-26, दिनांक 26/02/2019, शासन निर्णय क्र. संकीर्ण-2019/प्र.क्र.15/नवि-26, दिनांक 06/03/2019, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2019/प्र.क्र.15/नवि-26, दिनांक 08/03/2019 अन्वये निर्णय घेतलेले आहेत. सदर्हू निर्णयातील अटी व शर्ती पैकी अट क्र.1 अन्वये दिनांक 01/01/2011 किंवा त्यापूर्वी निवासी प्रयोजनासाठी अतिक्रमण करण्यात आलेले भुखंड नियमानुकूल करण्यात पात्र आहेत.

सदर्हू अटीची पूर्तता होणे हेतू अतिक्रमणधारकांकडून अद्यावत मालमत्ता कर रसीद हे एक दस्ताऐवज महत्वाचे ठरते, त्यामुळे प्रत्येक झोपडीधारकाने मालमत्ता कर महानगरपालिका निधीत जमा करुन अद्यावत मालमत्ता कर रसीद प्राप्त करुन घेवून भाडेपट्टा मिळण्याकरीता असलेल्या अटी ची ही पूर्तता सुलभरित्या करु शकेल, याकरीता थकीत मालमत्ता कर रकमेवर लागलेली शास्ती रक्कम माफ करण्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे परिशिष्ट "ड" प्रकरण 8 चे कराधान नियम क्र. 51 अन्वये आयुक्तांस प्राप्त असलेल्या अधिकारानुसार अतिक्रमित झोपडपट्टयातील अतिक्रमणधारकांनी/ झोपडीधारकांनी निव्वळ मालमत्ता कराची रक्कम भरण्याकरीता, मालमत्ता करावर लागलेली शास्ती/ दंड माफीची अभय योजना-2025 राबविण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

1. अभय योजनेचा कालावधी- दिनांक 01 ऑगष्ट,2025 ते 31 डिसेंबर, 2025 या कालावधीपर्यंत
2. योजनेची व्याप्ती - ज्या झोपडपट्टी क्षेत्रातील अतिक्रमणधारकांना /झोपडपट्टीवासियांना भाडेपट्टा देणे अपेक्षीत आहे, अशाच अतिक्रमणधारकाच्या भोगवटयातील जागा /झोपडी/घर या करीता मालमत्ता कर रकमेच्या थकीत रक्कमेवरील शास्ती व दंडाची रक्कम 100 टक्के माफ करण्यात येईल.
3. योजनेचा लाभ खालील बाबीसाठी अनुज्ञेय राहील-
   अभय योजना-2025 लागू असलेल्या काळात फक्त अतिक्रमित असलेल्या झोपडपट्टयातील कर दात्यांकडून नागपूर महानगरपालिकेस घेणे असलेल्या मुळ रकमचे 100% अधिदान केल्यास थकीत रकमेवर नियम 41 अन्वये प्रतिमाह 2% आकारण्यात आलेला दंड व नियम 50 खालील जप्ती अधिपत्र बजावणी शुल्क किंवा वसुलीचा खर्च पुर्णत: माफ करण्यात येईल.

4. अभय योजने अंतर्गत सवलतीस पात्र असलेल्या रक्कमा – सदर योजना ही नमूद केलेल्या कालावधीत जमा केलेल्या रकमांनाच लागू राहील. या योजनेच्या प्रारंभापूर्वी अथवा समाप्तीनंतर भरणा केलेल्या रकमांना लागू राहणार नाही. योजना सुरु होण्यापूर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रकमेच्या परताव्यासाठी या योजने अंतर्गत मागणी/दावा करता येणार नाही.
5. अभय योजने नुसार करावयाचा भरणा आणि अपील मागे घेणे इत्यादी अभय योजनेच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी लागू असणाऱ्या अटी –
    - ज्या कालावधीसाठी सवलतीचा लाभ घ्यावयाचा आहे, त्या कालावधीचे कोणतेही प्रलंबित असलेले अपील पुनर्निरीक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, मा.न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका प्रलंबित असल्यास ते विना अट मागे घेतले पाहिजे.
    - जर अभय योजनेचा लाभ मिळाल्यानंतर अपील, पुनर्निरीक्षण आवेदन, संदर्भ आवेदन, मा.न्यायालयात दावा किंवा रिट याचिका दाखल केली तसेच भविष्यात सदहू योजनेतील लाभधारक मालमत्ता कर करीता थकबाकीदार आढळल्यास अभय योजने नुसार संबंधीत कालावधीसाठी दिलेल्या सवलती काढून घेण्यात येतील.
    - अतिक्रमित झोपडपट्टी क्षेत्रातील अतिक्रमण धारकांकारीता मालमत्ता कर "अभय योजना-2025" चा लाभधारक भविष्यात मिळकतकर रकमांकरीता थकीतदार राहणार नाही, असा लिखीत कबुली वचननामा संबंधीत लाभधारकांनी लाभ घेतेवळी सादर करणे गरजेचे राहील.
6. आयुक्तांचे अधिकार प्रदान करणे - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 69 अन्वये आयुक्तांस असलेले अधिकार कलम 128 व प्रकरण 8 कराधान नियम मधील नियम 51 नुसार वरील अभय योजना कालावधीपर्यंत (दिनांक 01 ऑगष्ट, 2025 ते 31 डिसेंबर,2025) फक्त उपायुक्त(महसूल) यांना प्रदान करण्यात येत आहेत, त्यानंतर ते संपुष्टात येतील.
7. कार्यवाही विषयक बाबी -
    - मालमत्ता कर आकारणी विभागाने "अभय योजना-2025" राबविण्यासाठी मागणी नोंदवहीत सदर रक्कमा माफ केल्याची नोंद करदात्याने कराचे संपूर्ण रक्कमेचे अधिदान केल्यानंतरच घ्यावी.
    - मे. सायबरटेक सिस्टीम ॲन्ड सॉफ्टवेअर प्रा.लि. यांनी "अभय योजना-2025" राबविण्यासाठी संगणक प्रणालित योग्य ते बदल तत्काळ करावयाचे असून माफ करण्यात येणारी दंडाची रक्कम ही करदाता ज्या क्षणास कराचा भरणा करेल त्या क्षणास (Real Time) माफी देणेबाबत बदल करावेत व तसे प्रमाणपत्र/दाखला करदात्यास देण्यात यावा.
8. अभय योजनेची जाहिरात व प्रसिध्दी –
    - ➢ अतिक्रमित झोपडपट्टी क्षेत्रासाठी "अभय योजना-2025" राबविण्यासाठी अतिक्रमित झोपडपट्टयातील नागरीकांकडून मोठया प्रमाणावर प्रतिसादर मिळावा यासाठी सदर योजनेच्या तपशीलाबाबत खालील माध्यमातून प्रसिध्दी देण्यात यावी.

    1. इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे तथा वर्तमानपत्रव्दारे प्रसिध्दी देण्यात यावी.
    2. महापालिकेच्या संकेत स्थळावर देखील सदर योजनेचा तपशील देण्यात यावा.
    3. सर्व झोन कार्यालयांतर्गत येणाऱ्या मनपा मालकीच्या जागेवरील झोपडपट्टया, शासकीय जमिनीवरील झोपडपट्टया, ना.सु.प्र. मालकीच्या जमिनीवरील झोपडपट्टया क्षेत्रात, झोन कार्यालयात, वसुली केंद्रावर "अतिक्रमित झोपडपट्टी क्षेत्रासाठी मालमत्ता कर अभय योजना-2025" चे फलक लावण्यात यावे.
    4. स्थानिक T.V.Channel व्दारा, रेडीओ स्टेशन व्दारा "अतिक्रमित झोपडपट्टी क्षेत्रासाठी मालमत्ता कर अभय योजना-2025" ची प्रसिध्दी देण्यात यावी.

5. नागपूर शहरातील एकूण 426 झोपडपट्टयात ऑटो फिरवून ध्वनी प्रक्षेपणाव्दारे मालमत्ता कर अभय योजनेची प्रसिध्दी देण्यात यावी.
6. सर्व झोन कार्यालयाव्दारे त्यांचे झोन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या झोपडपट्टयातील प्रत्येक नागरीकांच्या घरी माहितीपत्रके वाटून मालमत्ता कर अभय योजनेची माहिती देण्यात येवून मनपा मुख्यालयी झोपडपट्टी पट्टा वाटप कक्ष / मालमत्ता कर विभाग मुख्यालयात मालमत्ता कराचा भरणा करुन घेवून आपल्या नावे भाडेपट्टा करुन घेण्याबाबत प्रोत्साहित करावे.
7. महानगरपालिकेच्या Advertising sites वर Hoardings लावून "अतिक्रमित झोपडपट्टी क्षेत्रासाठी मालमत्ता कर अभय योजना-2025" ची प्रसिध्दी देण्यात यावी.
8. खाजगी Advertising sites करीता खाजगी एजन्सीला विनंती करुन "अतिक्रमित झोपडपट्टी क्षेत्रासाठी मालमत्ता कर अभय योजना-2025" चे Hoardings खाजगी Advertising sites वर लावण्यात यावे.

उपरोक्त प्रमाणे "अतिक्रमित झोपडपट्टी क्षेत्रासाठी मालमत्ता कर अभय योजना-2025" राबविण्याबाबतचा प्रश्न विचारात घेणे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 34/**मनपा/प्रशासक** **दिनांक** :- 30/07/2025

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (महसूल) तथ नियंत्रण अधिकारी, झो.प. वाटप कक्ष यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील, नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय विभागाच्या मालकीच्या (वन विभाग वगळून) ना.सु.प्र. च्या मालकीच्या जागेवरील अतिक्रमित झोपडपट्टयातील अतिक्रमणे नियमानुकूल करुन भाडेपट्टा देण्याकरीता अशा जागेवरील जागा / झोपडी / घर करीता थकीत असलेल्या मालमत्ता करावर आकारलेली शास्ती माफ करण्याकरीता अभय योजना-2025 राबविणे.

"सर्वांसाठी घरे-2022" या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी होणे हेतू नागपूर महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवरील, नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील शासकीय विभागाच्या मालकीच्या (वन विभाग वगळून) ना.सु.प्र. च्या मालकीच्या जागेवरील अतिक्रमित झोपडपट्टयातील अतिक्रमणे नियमानुकूल करुन भाडेपट्टा देण्याबाबत महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्र.एमसीओ-2018/प्र.क्र.197/नवि-18, दिनांक 17/11/2018, महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक 14/01/2019 ची अधिसूचना, शासन निर्णय क्र.एमसीओ-2018/प्र.क्र.309/नवि-14, दिनांक 07/02/2019, शासन निर्णय शुध्दीपत्रक क्र.एमयुएन-2015/प्र.क्र.53/नवि-26, दिनांक 26/02/2019, शासन निर्णय क्र. संकीर्ण-2019/प्र.क्र.15/नवि-26, दिनांक 06/03/2019, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2019/प्र.क्र.15/नवि-26, दिनांक 08/03/2019 अन्वये निर्णय घेतलेले आहेत. सदर्हू निर्णयातील अटी व शर्ती पैकी अट क्र.1 अन्वये दिनांक 01/01/2011 किंवा त्यापूर्वी निवासी प्रयोजनासाठी अतिक्रमण करण्यात आलेले भुखंड नियमानुकूल करण्यात पात्र आहेत.

सदर्हू अटीची पूर्तता होणे हेतू अतिक्रमणधारकांकडून अद्यावत मालमत्ता कर रसीद हे एक दस्ताऐवज महत्वाचे ठरते, त्यामुळे प्रत्येक झोपडीधारकाने मालमत्ता कर महानगरपालिका निधीत

जमा करुन अद्यावत मालमत्ता कर रसीद प्राप्त करुन घेवून भाडेपट्टा मिळण्याकरीता असलेल्या अटी ची ही पूर्तता सुलभरित्या करु शकेल, याकरीता थकीत मालमत्ता कर रकमेवर लागलेली शास्ती रक्कम माफ करण्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे परिशिष्ट "ड" प्रकरण 8 चे कराधान नियम क्र. 51 अन्वये आयुक्तांस प्राप्त असलेल्या अधिकारानुसार अतिक्रमित झोपडपट्टयातील अतिक्रमणधारकांनी/ झोपडीधारकांनी निव्वळ मालमत्ता कराची रक्कम भरण्याकरीता, मालमत्ता करावर लागलेली शास्ती/ दंड माफीची अभय योजना-2025 राबविण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

1. अभय योजनेचा कालावधी- दिनांक 01 ऑगष्ट,2025 ते 31 डिसेंबर, 2025 या कालावधीपर्यंत
2. योजनेची व्याप्ती - ज्या झोपडपट्टी क्षेत्रातील अतिक्रमणधारकांना /झोपडपट्टीवासियांना भाडेपट्टा देणे अपेक्षीत आहे, अशाच अतिक्रमणधारकाच्या भोगवटयातील जागा /झोपडी/घर या करीता मालमत्ता कर रकमेच्या थकीत रक्कमेवरील शास्ती व दंडाची रक्कम 100 टक्के माफ करण्यात येईल.
3. योजनेचा लाभ खालील बाबीसाठी अनुज्ञेय राहील-
   अभय योजना-2025 लागू असलेल्या काळात फक्त अतिक्रमित असलेल्या झोपडपट्टयातील कर दात्यांकडून नागपूर महानगरपालिकेस घेणे असलेल्या मुळ रकमचे 100% अधिदान केल्यास थकीत रकमेवर नियम 41 अन्वये प्रतिमाह 2% आकारण्यात आलेला दंड व नियम 50 खालील जप्ती अधिपत्र बजावणी शुल्क किंवा वसुलीचा खर्च पुर्णत: माफ करण्यात येईल.
4. अभय योजने अंतर्गत सवलतीस पात्र असलेल्या रक्कमा – सदर योजना ही नमूद केलेल्या कालावधीत जमा केलेल्या रकमांनाच लागू राहील. या योजनेच्या प्रारंभापूर्वी अथवा समाप्तीनंतर भरणा केलेल्या रकमांना लागू राहणार नाही. योजना सुरु होण्यापूर्वी भरणा केलेल्या कोणत्याही रकमेच्या परताव्यासाठी या योजने अंतर्गत मागणी/दावा करता येणार नाही.
5. अभय योजने नुसार करावयाचा भरणा आणि अपील मागे घेणे इत्यादी अभय योजनेच्या सवलतीचा लाभ घेण्यासाठी लागू असणाऱ्या अटी –
   - ज्या कालावधीसाठी सवलतीचा लाभ घ्यावयाचा आहे, त्या कालावधीचे कोणतेही प्रलंबित असलेले अपील पुनर्निरीक्षणासाठी आलेले आवेदन, संदर्भ आवेदन, मा.न्यायालयात दाखल केलेला दावा किंवा रिट याचिका प्रलंबित असल्यास ते विना अट मागे घेतले पाहिजे.
   - जर अभय योजनेचा लाभ मिळाल्यानंतर अपील, पुनर्निरीक्षण आवेदन, संदर्भ आवेदन, मा.न्यायालयात दावा किंवा रिट याचिका दाखल केली तसेच भविष्यात सदहू योजनेतील लाभधारक मालमत्ता कर करीता थकबाकीदार आढळल्यास अभय योजने नुसार संबंधीत कालावधीसाठी दिलेल्या सवलती काढून घेण्यात येतील.
   - अतिक्रमित झोपडपट्टी क्षेत्रातील अतिक्रमण धारकांकारीता मालमत्ता कर "अभय योजना-2025" चा लाभधारक भविष्यात मिळकतकर रकमांकरीता थकीतदार राहणार नाही, असा लिखीत कबुली वचननामा संबंधीत लाभधारकांनी लाभ घेतेवळी सादर करणे गरजेचे राहील.
6. आयुक्तांचे अधिकार प्रदान करणे - महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 69 अन्वये आयुक्तांस असलेले अधिकार कलम 128 व प्रकरण 8 कराधान नियम मधील नियम 51 नुसार वरील अभय योजना कालावधीपर्यंत (दिनांक 01 ऑगष्ट, 2025 ते 31 डिसेंबर,2025) फक्त उपायुक्त(महसूल) यांना प्रदान करण्यात येत आहेत, त्यानंतर ते संपुष्टात येतील.
7. कार्यवाही विषयक बाबी -

- मालमत्ता कर आकारणी विभागाने "अभय योजना-2025" राबविण्यासाठी मागणी नोंदवहीत सदर रक्कमा माफ केल्याची नोंद करदात्याने कराचे संपूर्ण रक्कमेचे अधिदान केल्यानंतरच घ्यावी.
- मे. सायबरटेक सिस्टीम ॲन्ड सॉफ्टवेअर प्रा.लि. यांनी "अभय योजना-2025" राबविण्यासाठी संगणक प्रणालित योग्य ते बदल तत्काळ करावयाचे असून माफ करण्यात येणारी दंडाची रक्कम ही करदाता ज्या क्षणास कराचा भरणा करेल त्या क्षणास (Real Time) माफी देणेबाबत बदल करावेत व तसे प्रमाणपत्र/दाखला करदात्यास देण्यात यावा.

8. अभय योजनेची जाहिरात व प्रसिध्दी –

➢ अतिक्रमित झोपडपट्टी क्षेत्रासाठी "अभय योजना-2025" राबविण्यासाठी अतिक्रमित झोपडपट्टयातील नागरीकांकडून मोठया प्रमाणावर प्रतिसादर मिळावा यासाठी सदर योजनेच्या तपशीलाबाबत खालील माध्यमातून प्रसिध्दी देण्यात यावी.

1. इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे तथा वर्तमानपत्रव्दारे प्रसिध्दी देण्यात यावी.
2. महापालिकेच्या संकेत स्थळावर देखील सदर योजनेचा तपशील देण्यात यावा.
3. सर्व झोन कार्यालयांतर्गत येणाऱ्या मनपा मालकीच्या जागेवरील झोपडपट्टया, शासकीय जमिनीवरील झोपडपट्टया, ना.सु.प्र. मालकीच्या जमिनीवरील झोपडपट्टया क्षेत्रात, झोन कार्यालयात, वसुली केंद्रावर "अतिक्रमित झोपडपट्टी क्षेत्रासाठी मालमत्ता कर अभय योजना-2025" चे फलक लावण्यात यावे.
4. स्थानिक T.V.Channel व्दारा, रेडीओ स्टेशन व्दारा "अतिक्रमित झोपडपट्टी क्षेत्रासाठी मालमत्ता कर अभय योजना-2025" ची प्रसिध्दी देण्यात यावी.
5. नागपूर शहरातील एकूण 426 झोपडपट्टयात ऑटो फिरवून ध्वनी प्रक्षेपणाव्दारे मालमत्ता कर अभय योजनेची प्रसिध्दी देण्यात यावी.
6. सर्व झोन कार्यालयाव्दारे त्यांचे झोन क्षेत्रांतर्गत येणाऱ्या झोपडपट्टयातील प्रत्येक नागरीकांच्या घरी माहितीपत्रके वाटून मालमत्ता कर अभय योजनेची माहिती देण्यात येवून मनपा मुख्यालयी झोपडपट्टी पट्टा वाटप कक्ष / मालमत्ता कर विभाग मुख्यालयात मालमत्ता कराचा भरणा करुन घेवून आपल्या नावे भाडेपट्टा करुन घेण्याबाबत प्रोत्साहित करावे.
7. महानगरपालिकेच्या Advertising sites वर Hoardings लावून "अतिक्रमित झोपडपट्टी क्षेत्रासाठी मालमत्ता कर अभय योजना-2025" ची प्रसिध्दी देण्यात यावी.
8. खाजगी Advertising sites करीता खाजगी एजन्सीला विनंती करुन "अतिक्रमित झोपडपट्टी क्षेत्रासाठी मालमत्ता कर अभय योजना-2025" चे Hoardings खाजगी Advertising sites वर लावण्यात यावे.

उपरोक्त प्रमाणे "अतिक्रमित झोपडपट्टी क्षेत्रासाठी मालमत्ता कर अभय योजना-2025" राबविण्याबाबतच्या प्रस्तावास मा. प्रशासक यांनी मंजुरी प्रदान केली.